06-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/05/2025 11:31 PM Page 1



हरमलातील बेकायदा नऊ झोपड्या जमिनदोस्त » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



शानदार विजयासह न्यूझीलंड फायनलमध्ये » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, ६ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 182 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 6 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### केदारनाथ धाममध्ये रोपवेला मंजुरी

**उत्तराखंड, दि. ५ :** केदारनाथ धाम आणि हेमकुंड साहिबसाठी रोपवे प्रकल्पाला केंद्राने मंजुरी दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाल्या, 'सध्या ८-९ तासांत पूर्ण होणारा प्रवास ३६ मिनिटांपर्यंत कमी केला जाईल. त्यात ३६ लोक बसण्याची क्षमता असेल. राष्ट्रीय रोपवे विकास कार्यक्रमांतर्गत, उत्तराखंडमधील सोनप्रयाग ते केदारनाथ (१२.९ किमी) आणि गोविंदघाट ते हेमकुंड साहिबजी (१२.४ किमी) पर्यंत एक रोपवे बांधला जाईल. राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक्स व्यवस्थापन ते बांधेल. केदारनाथमध्ये भगवान शिवाचे मंदिर आहे. ते समुद्रसपाटीपासून ३,५८४ मीटर उंचीवर आहे. मंदाकिनी नदी इथे आहे. केदारनाथ धाम हे भगवान शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. दर तासाला १८०० प्रवाशांना रोपवेने केदारनाथला नेले जाईल. केदारनाथमध्ये बांधल्या जाणाऱ्या रोपवेमध्ये सर्वात प्रगत ट्राय-केबल डिटेचेबल गोंडोला तंत्र असेल. याद्वारे दर तासाला १८०० आणि दररोज १८ हजार यात्रेकरूंची वाहतूक केली जाईल.

---

### बंगळुरू विमानतळावर २.५६ कोटींचे सोने जप्त

**बंगळुरू, दि. ५ :** महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये एका महिलेकडून परदेशी सोन्याच्या विटा जप्त केल्या आहेत. या सोन्याची किंमत सुमारे १२.५६ कोटी रुपये असून, संबंधित महिला ३ मार्च २०२५ रोजी दुबईहून एमिरेट्स विमानाने बंगळूर येथे आली होती.

महिलेची चौकशी केल्यानंतर डीआरआय अधिकाऱ्यांनी तिच्या बंगळुरातील लॅव्हल रोड येथील निवासस्थानी छापा टाकला. यादरम्यान, तेथे २.०६ कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि २.६७ कोटी रुपयांची रोकड आढळून आली. संपूर्ण कारवाईत जप्त केलेल्या मालाची एकूण किंमत १७.२९ कोटी रुपये इतकी असून, एकूण १४.२ किलो सोने हस्तगत करण्यात आले आहे. ही कारवाई बंगळूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर अलीकडील काळात केलेली सर्वात मोठी मानली जात आहे. संबंधित महिलेविरोधात सीमाशुल्क अधिनियम अंतर्गत कारवाई करत तिला अटक करण्यात आली असून, तिला न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहे.

---

### बारामुल्ला पोलिस चौकीवर ग्रेनेड हल्ला

**जम्मू, दि. ५ :** जम्मू-कश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील पोलिस चौकी ओल्ड टाउनजवळ संशयास्पद ग्रेनेड हल्ला करण्यात आला आहे. मंगळवारी रात्री उशिरा ही घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री पोलिस चौकीच्या मागील बाजूने स्फोटासारखा आवाज ऐकू आला, ज्यामुळे तातडीने सुरक्षा पथके तैनात करण्यात आली. इतर सुरक्षा यंत्रणांशी संपर्क साधून पोलिस पथकांनी या परिसराला त्वरित वेढा घातला आणि शोध मोहीम सुरू केली.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ८८,३८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९८,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७२,३६५.५७ ↑ (३१.१२)
निफ्टी : २२,१३५.६० ↑ (३३.९५)

# सिद्दिकीने पुन्हा उडवला गोवा पोलिसांचा 'मजाक'!

## न्यायालयात हजर होतानाच माध्यमांना दिले खळबळजनक पाच पानी पत्र | पत्रात राजकीय नेत्यांवर गंभीर आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ५ :गोवा पोलिस दलातील सुरक्षेच्या त्रुटींवर पुन्हा एकदा प्रकाश टाकणाऱ्या प्रकरणात जमीन हडपण्याच्या प्रकरणातील प्रमुख आरोपी सुलेमान खान ऊर्फ सिद्दिकी याने माध्यमांच्या हाती एक खळबळजनक पत्र दिले आहे. या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय आणि कायदेशीर वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.**

बुधवारी, पणजी येथील आल्तिनो न्यायालयात सुनावणीदरम्यान, सुलेमान खानने चक्क पोलिसांच्या उपस्थितीतच पत्रकारांच्या हाती एक पत्र सोपवले. या पत्रात त्याने गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यावर आपल्याला सराईत गुन्हेगार म्हणून चुकीचे लेबल लावल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्याने असेही नमूद केले की, दोष सिद्ध होईपर्यंत ते निर्दोष असून त्याच्यावरील आरोप हे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. त्यामुळे हे प्रकरण सीबीआयकडे द्यावे, अशी मागणी त्याने पत्रात केली आहे.

खान याने आपल्या पत्रात राजकीय दबाव, पोलिसांकडून छळ आणि मालमत्तेच्या जबरदस्ती हस्तांतरणासंदर्भातील अनेक आरोप केले आहेत. खान याच्या मते, १९९६ मध्ये म्हापसा येथे त्याने २० हजार ८१९ चौरस मीटरचा भूखंड कायदेशीरपणे विकत घेतला होता. मात्र, काही वर्षांनंतर काही जणांनी त्या जमिनीवर दावा सांगितला. दिवंगत उपमुख्यमंत्री फ्रान्सिस डिसोझा यांनी २०१३ मध्ये त्याच्यावर दबाव टाकून त्यांचा मुलगा जोशुवा डिसोझा यांना मालमत्ता हस्तांतरित करण्यास सांगितले, असा त्याचा आरोप आहे. त्यांनी त्यासाठी मोठी रक्कम ऑफर केल्याचा दावा खानने केला आहे. खान याच्या मते, २०१४ आणि २०१६ मध्ये त्याच्यावर खोटे खटले दाखल करण्यात आले. जामीन मिळाल्यानंतरही त्याचा छळ सुरू असल्याचा आरोप त्याने केला आहे. २०२४ मध्ये झालेल्या अटकेदरम्यान पोलिसांनी त्याला मारहाण केली आणि विजेचे झटके दिले, असा दावाही त्याने या पत्रात



केला आहे.

पोलिसांनी धमकी देऊन त्याच्याकडून व्हिडिओ जबाब देण्यास भाग पाडले, असा त्याचा आरोप आहे.

या पत्राच्या पार्श्वभूमीवर, गोवा पोलिस आणि राज्य सरकार यावर अधिकृत प्रतिक्रिया देण्याचे टाळत आहेत. मात्र, या आरोपांमुळे राज्याच्या प्रशासनावर आणि कायद्याच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सुलेमान खान याचे दावे कितपत खरे आहेत, याबाबत चौकशी होण्याची मागणी आता जोर धरत आहे. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई आणि सरकारी यंत्रणांची प्रतिक्रिया महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे गोव्यातील राजकीय आणि कायदेशीर वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

दरम्यान आरोपी सिद्दिकी ऊर्फ सुलेमान खान याने न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी (जेएमएफसी) न्यायालयात हजर होतानाच पोलिस असतानाही माध्यमांसमोर एक पत्र सादर केल्यामुळे राज्य पोलिस विभाग नव्याने चौकशीच्या भोवऱ्यात सापडला आहे. या घटनेमुळे उच्च जोखीम असलेल्या आरोपींच्या सुरक्षेतील त्रुटींवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पत्रातील आरोप समोर येताच पोलिसांनी तातडीने त्याच्या सुरक्षेत वाढ केली व चेहरा झाकून त्याला न्यायालयातून बाहेर काढले.

या घटनेमुळे निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उत्तर गोवा पोलिस अधीक्षक (एसपी) अक्षत कौशल यांना स्वत: आरोपीसाठी अतिरिक्त सुरक्षा पुरवण्यासाठी घटनास्थळी दाखल व्हावे लागले. त्यांनी स्पष्ट केले की, सिद्दिकी याच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत आणि तो यापूर्वीही कोठडीतून पलायन करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अशा आरोपींच्या सुरक्षिततेची जबाबदारी पोलिसांची आहे.

सिद्दिकी याने याआधीही पोलिस यंत्रणेतील कमकुवतपणा उघड केला आहे. यापूर्वी न्यायालयीन कोठडीत असताना त्याने मोबाईल फोनच्या माध्यमातून वृत्तवाहिनीशी थेट संवाद साधत पोलिसांवरील अत्याचाराच्या तक्रारी मांडल्या होत्या. त्यामुळे सुरक्षेच्या व्यवस्थापनावर आधीच टीका झाली होती. मात्र, त्यानंतरही त्याने पुन्हा माध्यमांसमोर पत्र सादर करण्यास यश मिळवल्याने पोलिसांच्या सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी समोर आल्या आहेत.

या प्रकरणात आल्तिनो न्यायालयात हजेरी लावताना सिद्दिकीने उघडपणे पत्रकारांना कागदपत्रे दिली आणि ती न्यायाधीशांना उद्देशून असल्याचे सांगितले. या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना एसपी कौशल यांनी सांगितले की, आरोपीला कोणतीही माहिती थेट न्यायालयातच सादर करावी लागते. माध्यमांना पत्र देण्याचा प्रयत्न चुकीचा आहे आणि अशा बाबतीत कायदेशीर प्रक्रिया पाळली पाहिजे. मात्र, या घटनाक्रमामुळे गोवा पोलिस दलातील शिस्त व सुरक्षा प्रोटोकॉलच्या अंमलबजावणीतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. या घटनेमुळे न्यायप्रक्रियेत बाह्य हस्तक्षेप होण्याची शक्यता वाढली असून, राज्याच्या कायद्याच्या अंमलबजावणी यंत्रणेवरील विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभेतून अबू आझमी निलंबित

**मुंबई, दि. ५ :** अबू आझमी यांच्या औरंगजेबबद्धलच्या वादग्रस्त विधानामुळे महाराष्ट्र विधानसभेतही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, त्यांना संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले आहे. संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, आझमी यांच्या विधानामुळे सभागृहाची प्रतिष्ठा दुखावली आहे.

या वादाच्या पार्श्वभूमीवर, अबू आझमी यांनी आपली भूमिका स्पष्ट करत सांगितले की, त्यांच्या विधानाचा विपर्यास करण्यात आला आहे. त्यांनी सांगितले की, मी इतिहासकार आणि लेखकांनी औरंगजेब यांच्याबद्दल जे म्हटले आहे, तेच सांगितले आहे. मात्र, जर कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर मी माझे विधान मागे घेतो आणि त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.त्यांच्या या स्पष्टीकरणानंतरही राजकीय वातावरण तापलेले असून, भाजपा आणि समाजवादी पक्षामध्ये या मुद्यावर तिखट शाब्दिक युद्ध सुरू आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्या औरंगजेबविषयीच्या वादग्रस्त विधानावर तीव्र नाराजी व्यक्त करत, त्यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी सुचवले की, समाजवादी पक्षाने त्यांना पक्षातून हाकलून द्यावे आणि उत्तर प्रदेशात पाठवावे, जिथे त्यांच्यावर योग्य उपचार केला जाईल.

उत्तर प्रदेश विधानसभेत बोलताना योगी आदित्यनाथ म्हणाले की, समाजवादी पक्षाने त्यांना पक्षातून काढून टाकावे आणि उत्तर प्रदेशात पाठवावे, आम्ही त्यांच्या योग्य 'उपचाराची' व्यवस्था करू.त्यांच्या या वक्तव्याचा राजकीय वर्तुळात मोठा गाजावाजा झाला आहे. योगी आदित्यनाथ यांनी समाजवादी पक्षाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करताना म्हटले की, ज्या पक्षाचे नेते महाकुंभासारख्या धार्मिक आयोजनांवर टीका करतात, तेच औरंगजेबाचे समर्थन कसे करू शकतात? जो औरंगजेबाला आपला आदर्श मानतो, त्याला या देशात राहण्याचा अधिकार आहे का? असा सवाल त्यांनी केला. समाजवादी पक्षाचे (सपा) नेते अबू आझमी यांनी सोमवारी मुघल सम्राट औरंगजेब यास चांगला प्रशासक असे संबोधताच तीव्र वादंग निर्माण झाले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वक्तव्यावर तीव्र आक्षेप नोंदवित, ते देशद्रोह असल्याचे म्हटले आणि आझमी यांच्या विरोधात कायदेशीर कारवाईची मागणी केली होती. त्या काळातील राजे सत्तेसाठी आणि संपत्तीसाठी लढत असत, मात्र त्यामागे कोणतेही धार्मिक कारण नव्हते.

## पांडुरंग मडकईकरांच्या आरोपांवर विरोधकांचा हल्लाबोल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ५ :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजीमंत्री पांडुरंग मडकईकर यांनी सरकारी काम पूर्ण करण्यासाठी लाच दिल्याचा गंभीर आरोप केल्यानंतर, विरोधी पक्षांनी बुधवारी राज्य सरकारवर तीव्र निशाणा साधला. विरोधकांनी राज्य सरकारकडे संबंधित मंत्र्याविरोधात एफआयआर नोंदवण्याची मागणी केली असून, मडकईकर यांनी त्या मंत्र्याचे नाव आणि लाचखोरीचे स्वरूप उघड करण्याचा आग्रह धरला आहे.

गोवा फॉरवर्ड पार्टीचे (जीएफपी) अध्यक्ष आणि फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी या प्रकरणावर भाष्य करताना सांगितले की, भाजप सरकारमध्ये भ्रष्टाचार संस्थात्मक झाल्याचा हा स्पष्ट पुरावा आहे. मडकईकर यांनी केलेले वक्तव्य काही नवीन नाही, परंतु जर भ्रष्टाचारविरोधी यंत्रणांनी याची चौकशी केली नाही, तर याचा अर्थ सरकार भ्रष्टाचारास पाठबळ देत आहे.

सरदेसाई पुढे म्हणाले की, जर याप्रकरणी भ्रष्टाचारविरोधी विभाग किंवा दक्षता यंत्रणेने चौकशी केली नाही, तर भाजप सरकारने गोमंतकीय जनतेला स्पष्ट संदेश दिला आहे की, भ्रष्टाचार हा आता सरकारी व्यवस्थेचा भाग बनला आहे. इतकेच नव्हे, तर त्यांचे स्वतःचे नेतेसुद्धा भ्रष्टाचाराचे बळी ठरत आहेत. सरदेसाई यांनी याबाबत मंत्री माविन गुदिन्हो यांनी दिलेल्या प्रतिक्रीयेबद्दल मुद्दा उपस्थित करत सांगितले की, जेव्हा मंत्रिमंडळातील एका नेत्याला याबाबत प्रतिक्रिया विचारली, तेव्हा त्यांनी काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरांवर दगडफेक करू नये, असे विधान करत अप्रत्यक्ष धमकी दिली. हे केवळ बेजबाबदार विधान नसून, मडकईकर यांना गप्प करण्याचा प्रयत्न असल्याचा संशय आहे. त्यामुळे या विधानाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. त्यांनी भाजपचे केंद्रीय नेते आणि गोवा डेस्क प्रभारी बी. एल. संतोष यांच्या गोवा भेटीचा उल्लेख करत सांगितले की, भाजप सरकार भ्रष्टाचारात आकंठ बुडाले आहे, हे त्यांचे स्वतःचे नेतेच कबूल करत आहेत.

आम आदमी पक्षाचे (आप) गोवा अध्यक्ष अमित पालेकर यांनी भाजप सरकारवर एफआयआर दाखल करण्याच्या प्रक्रियेत दुटप्पी भूमिकेचा आरोप केला. पर्वरी येथे झाडांचे स्थलांतर आणि



मंदिर पाडण्याच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्यांविरूद्ध एफआयआर तत्काळ दाखल केला जातो. पण जेव्हा सरकारी अधिकाऱ्यांकडून सत्ताधारी आमदाराविरूद्ध तक्रार होते, तेव्हा पोलिस कारवाई करत नाहीत, असा आरोप पालेकर यांनी केला. मडकईकर यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस बी. एल. संतोष यांची भेट घेतल्यानंतरच लाचखोरीचा आरोप केला. त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, एका मंत्र्याने कामासाठी २० लाख रुपयांची मागणी केली आणि ते त्यांनी दिले असतानाही त्यांचे काम झालेले नाही. मग अशा गंभीर आरोपांनंतर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल का केला नाही? असा सवाल त्यांनी केला.

गोवा प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष अमित पाटकर यांनी भाजप सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करत म्हटले की, हे आतापर्यंतचे सर्वांत भ्रष्ट सरकार आहे. यापूर्वीही भाजपच्या नेत्यांनीच आपल्या मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. लाच देणे आणि घेणे दोन्ही गुन्हे आहेत. त्यामुळे या प्रकरणी एफआयआर दाखल होणे आवश्यक आहे. मडकईकर यांनी स्वतः लाच दिल्याचे मान्य केले आहे, म्हणजेच ते देखील गुन्हेगार ठरतात. मग त्यांना हे माहित नव्हते का की लाच देणे गुन्हा आहे? असा सवाल पाटकर यांनी उपस्थित केला. दरम्यान वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांनी मडकईकर यांना थेट आव्हान देत म्हटले की, त्यांच्याकडे पुरावे असतील, तर त्यांनी संबंधित मंत्र्याचे नाव जाहीर करावे. तसेच पोलिसांकडे तक्रार करावी. केवळ आरोप करून वाद निर्माण करणे योग्य नाही. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनीही थेट उत्तर देण्याचे टाळले आणि हा प्रश्न मडकईकर यांनाच विचारला पाहिजे, असे सांगितले. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, भाजप सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप गंभीर वळण घेण्याची शक्यता आहे. आता मडकईकर आपल्या आरोपांवर ठाम राहतात का आणि सरकार यावर कोणती भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---

## डॉ. मोहन आगाशे यांचे वृद्धत्व आणि मानसिक आरोग्यावर विचारमंथन

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** प्रसिद्ध अभिनेते, मानसोपचारतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. मोहन आगाशे यांनी नुकतेच गोव्यात झालेल्या एका अधिवेशनात वृद्धापकाळाबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन केले. या कार्यक्रमात एक विशेष चित्रपट प्रदर्शन आणि चर्चा झाली, जिथे आगाशे यांनी स्मृतिभ्रंश, वृद्धत्व आणि वृद्धांना भेडसावणाऱ्या मानसिक आरोग्य आव्हानांवर त्यांचे कौशल्य सांगितले. या आकर्षक सत्रात सहभागींना लवकर निदान, काळजी घेण्याच्या धोरणे आणि स्मृतिभ्रंश आणि इतर मानसिक आरोग्य स्थिती असलेल्या व्यक्तींसाठी सामुदायिक मदतीची आवश्यकता याबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळाली. निरोगी वृद्धत्व आणि कुटुंबाच्या बदलत्या संकल्पनेवरील लघुपटांच्या मदतीने त्यांनी आपले मत मांडले. समाज कल्याण संचालनालय आणि हमसाथ ट्रस्ट गोवा यांनी आमंत्रित केल्यानंतर ते गोव्यात आले होते.

आगाशे यांनी सभागृहातील सर्वांना त्यांच्याबद्दल जे काही ऐकले आहे ते विसरून जाण्याचे आवाहन करून धक्का दिला. ते म्हणाले, स्मृतिभ्रंश हा एक आशीर्वाद आहे. ही देवाची देणगी आहे जी तुम्ही विसरता. ते म्हणाले की तरुणांशी संपर्कात राहणे महत्वाचे आहे कारण ते वर्तमानाशी जोडलेले आहेत. जुन्या काळात ते कसे होते याबद्दल बोलणे महत्वाचे नव्हते तर आज काय चालले आहे याचा मागोवा ठेवणे महत्वाचे होते.

सिनेमाबद्दल बोलताना ते म्हणाले, चित्रपट हा पॉपकॉर्नच्या पलीकडे आहे. तुम्हाला निरोगी मनोरंजन आणि जंक मनोरंजनाची



जाणीव असणे देखील आवश्यक आहे. आणि त्यालाच आरोग्यासाठी सिनेमॅटिक डाएट म्हणतात.

२०१६ मध्ये त्यांनी तरुणांकडे पाहिले तेव्हा त्यांनी तरुणांमध्ये नैराश्य आणि आत्महत्या याबद्दल 'कॅसल' नावाचा चित्रपट बनवला तेव्हा त्यांना समस्या काय आहे हे माहित होते. तेव्हाच त्यांनी तरुणांना त्यांच्या भावना सोडवण्यास मदत करण्यासाठी एक कार्यक्रम सुरू केला, कारण त्यांना भावनांबद्दल कधीच शिकवले जात नाही. ते म्हणाले, आम्ही कधीही भावनांबद्दल बोललो नाही, प्रत्यक्षात ते पूर्णपणे आपल्या अनुभवावर सोडले जाते. आणि आपल्याला जे शिकवले जाते ते आपल्याला फक्त विश्लेषण करण्यास मदत करते. ते आपल्याला समजून घेण्यास मदत करत नाही. कारण आपले औपचारिक शिक्षण पूर्णपणे संज्ञानात्मक विकास आणि संज्ञानात्मक विचारसरणीवर आधारित आहे. डॉ. आगाशे म्हणाले की ते नेहमीच अशा लोकांचा शोध घेत असतात जे खूप वाचतात आणि जे वाचतात ते समजतात. त्यांनी सांगितले की एखाद्याला एक तास वाचू द्या आणि त्याला विचारा आणि ते दहा मिनिटांत कथा सांगतील. त्यांनी सहभागींना विचारले की त्यांना अतिदक्षता विभागात किती वेळा दाखल व्हायला आवडेल. ते हसले आणि म्हणाले, जर तुम्ही रुग्णालयांना, विशेषतः कॉर्पोरेट रुग्णालयांना, भेट दिली तर त्यांचे क्रिटिकल केअर आणि अतिदक्षता विभागात ९० टक्क्यांहून अधिक वृद्ध लोक असतात, ज्यांना वारंवार दाखल होण्याचा आणि डिस्चार्ज देण्याचा इतिहास आहे.

आगाशे म्हणाले की तंत्रज्ञानाचा विकास होईल आणि तुम्हाला तांत्रिक मदत मिळू शकेल परंतु ती तुम्हाला मानवता देत नाही. ते म्हणाले की त्यांना गोव्यातील समस्यांची जाणीव आहे. जेव्हा लोक वृद्ध होतात, जर त्यापैकी एक लवकर गेला तर ते कसे व्यवस्थापित करतात हे कठीण असते आणि कुटुंबाने हस्तक्षेप करणे महत्वाचे होते.